।।श्री राम समर्थ।।
।।श्री नागनाथ प्रसन्न।।
महेश गायकवाड
मो. ९७६७०४०८४३
७७४१०८४५४५
श्री शारदा रोपवाटिका
टोमॅटो, मिरची, वांगी, झेंडू, कलिंगड, खरबूज, कोबी, फ्लॉवर, शिमला मिरची, ऊस-८६०३२, २६५, पपई (७८६),पपई आइस बेरी इ.
आमच्याकडे वरील सर्व जातीची ट्रे मधील व गादी वाफ्यावरील दर्जेदार रोपे तसेच ग्रॅण्ड-जी ९ केळी रोपे शोभेची झाडे योग्य दरात मिळतील.
सोलापूर-पुणे रोडवर, मोहोळ, कृषी विज्ञान केंद्राच्या पाठीमागे, मोहोळ.



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com



विकास वॉटरप्रुफिंग
घर व बंगला गळतीपासून राहील आता दूर... तेही वर्षानुवर्ष
विकास वॉटरप्रुफिंग घेऊन आले आहे नवीन टेक्नॉलॉजी, केमिकलद्वारे गॅरेंटीने लिकेच थांबवली जाते.
संपर्क : M- 9067317011 / 7387644827



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २३६ वा | मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# मुख्यमंत्री फडणवीसांच्या दौऱ्यात राजेंद्र राऊतांना विधान परिषदेचे गिफ्ट ?

**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** विधान परिषद निवडणुकीचे पडघम राज्यात जोरजोरात वाजत असताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आज (ता. 28 एप्रिल) भगवंत महोत्सवाच्या निमित्ताने बार्शीच्या दौऱ्यावर येत आहेत.

तब्बल 04 वर्षांनंतर बार्शी येणारे फडणवीस माजी आमदार राजेंद्र राऊत यांच्यासाठी गोड घोषणा करणार का, याची उत्सुकता बार्शीकरांना लागली आहे.

विधान परिषदेतील नऊ जागा रिक्त झाल्या असून त्यात पाच जागा ह्या भारतीय जनता पक्षाच्या (BJP) वाट्याला येतात. त्या जागेवर सोलापूर जिल्ह्यातील कोणत्या नेत्याची वर्णी लागते ? हे पाहावे लागणार आहे. कारण निवृत्त होणाऱ्यांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील रणजितसिंह मोहिते पाटील यांचा समावेश आहे.

विधान परिषदेसाठी सोलापूर जिल्ह्यातून माजी आमदार प्रशांत परिचारक, राजेंद्र राऊत, राम सातपुते आणि शहाजी पवार यांची नावे चर्चेत आहेत. पंढरपूर विधानसभा निवडणुकीत माघार घेताना परिचारक यांना तत्कालीन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी परिचारक हे विधीमंडळात दिसतील, असा शब्द दिला होता. मात्र, अजूनही तो शब्द पूर्ण झालेला नाही. त्यामुळे पहिला क्लेम हा परिचारकांचा असल्याचे मानले जात आहे.



विधानसभेची निवडणूक हरल्यानंतर माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी आपल्या कार्यशैलीत बदल करत बार्शी बाजार समिती, नगरपालिकेपाठोपाठ पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेच्या सर्वच्या सर्व जागांवर विजय मिळविला आहे. त्यामुळे पक्षाला सर्वच निवडणुकांमध्ये यश मिळवून देणारे राजेंद्र राऊत यांचे नावही विधान परिषदेसाठी चर्चेत आहे.

माजी आमदार राऊत यांचे नाव चर्चेत असले तरी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद बार्शी तालुक्याला देण्यात आलेले आहे, त्यामुळे राऊत यांना विधान परिषदेवर संधी मिळणार का, हा खरा प्रश्न आहे. पण, सदस्य नोंदणीसह निवडणुकांमध्येही भाजपला अव्वल स्थान मिळवून देणाऱ्या राऊत यांना बार्शीच्या दौऱ्यावर येणारे मुख्यमंत्री फडणवीस हे विधान परिषदेचे गिफ्ट देणार का, याकडे सर्व तालुक्याचे लक्ष लागले आहे.

भगवंत महोत्सवाच्या निमित्ताने येणारे देवेंद्र फडणवीस हे बाशीर्साठी नवी कोणती घोषणा करणार, याचीही उत्सुकता बार्शीकरांना आहे. भगवंत मंदिरास 'अ' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा देण्याची घोषणा या वेळी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून होणार का, याबाबतही उत्कंठता आहे.

## मुंबई-सोलापूर वंदे भारत ट्रेनला पुणे स्थानकाजवळ अपघात

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** प्रवाशांच्या पसंतीस उतरलेल्या या वंदे भारतला सायंकाळी पुणे रेल्वे स्टेशनजवळ अपघात झाला. मुंबईवरुन सोलापूरकडे जाणाऱ्या रेल्वेचा कोच नं सी 15 रुळावरून घसरला. पुणेस्टेशनवरील प्लॅटफॉर्म नंबर 3 वर ट्रेन येत असताना हा अपघात झाला.

या घटनेमुळे काही काळ प्रवाशांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं होतं. मात्र, ट्रेनमधील सर्व प्रवासी सुखरुप आहेत. मुंबई आणि सोलापूरकरांच्या पसंतीस उतरलेली मुंबई-सोलापूर वंदे भारत ट्रेनला प्रवाशांचा उदंड प्रतिसाद मिळत असून मोठ्या संख्येने या ट्रेनेने प्रवासी प्रवास करतात.




प्रवाशांच्या पसंतीस उतरलेल्या या वंदे भारतला आज सायंकाळी पुणे रेल्वे स्टेशनजवळ अपघात झाला. मुंबईवरुन सोलापूरकडे जाणाऱ्या रेल्वेचा कोच नं सी 15 रुळावरून घसरला. पुणे स्टेशनवरील प्लॅटफॉर्म नंबर 3 वर ट्रेन येत असताना हा अपघात झाला, त्यामुळे काही काळ प्रवाशांमध्ये भीतीचं वातावरण पसरलं होतं. मात्र, ट्रेनमधील सर्व प्रवासी सुखरुप आहेत.

ट्रेन नंबर 22225 मुंबई ते सोलापूर वंदे भारत ही गाडी पुणे स्थानकात सायंकाळी सुमारे 7.30 वाजता प्लॅटफॉर्ममध्ये प्रवेश करत असताना डायमंड क्रॉसिंगवर चौथ्या डब्याचा एक ट्रॉली घसरला. पुणे स्थानकाच्या यार्ड रिमॉडेलिंग अंतर्गत या क्रॉसिंगच्या उन्नतीकरणाचे काम नियोजित आहे, तेव्हा ट्रेनला किरकोळ अपघात झाला. सुदैवाने या घटनेत कोणत्याही प्रवाशाला दुखापत झालेली नाही. सर्व प्रवासी सुरक्षित आहेत.

वंदे भारत ट्रेनमधील सी 15 या कोचमधील सर्व प्रवाशांच्या सोयीसाठी त्यांना दुसऱ्या रेकमध्ये हलविण्याची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली. दरम्यान, वंदे भारत ट्रेनचा कोच रुळावरुन घसरल्याची ही पहिलीच घटना आहे, यापूर्वी वंदे भारत ट्रेन अचानक बंद पडल्याने दुसऱ्या इंजिनने तिला नेण्यात आलो होते.

## खरीप हंगामपूर्व नियोजन बैठकीत आमदार कल्याणशेट्टी यांची सूचना

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून खरीप हंगाम यशस्वी करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. कोणत्याही परिस्थितीत बियाणे व खतांचा तुटवडा होऊ देऊ नये, यासाठी प्रशासनाने सज्ज राहावे, अशा स्पष्ट सूचना आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दिल्या.



महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत अक्कलकोट येथे तालुकास्तरीय खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक पार पडली. आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर बियाणे व खतांची वेळेवर उपलब्धता, कृषी सेवा शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे व खतांचा सुरळीत पुरवठा व्हावा यासाठी संबंधित विभागांना दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर पीक पद्धतीत बदल, पाण्याचे योग्य व्यवस्थापन आणि कीड-रोग नियंत्रणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शेतकऱ्यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. योग्य वेळी मार्गदर्शन, तंत्रज्ञान आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यास उत्पादनात निश्चित वाढ होईल. शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे, असेही आमदार कल्याणशेट्टी यांनी नमूद केले.

या बैठकीस पंचायत समिती सभापती रश्मी हिप्परगी, उपसभापती सागर कल्याणशेट्टी, बाजार समिती उपसभापती अप्पासाहेब पाटील, तालुका कृषी अधिकारी चंद्रकांत मंगरुळे यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, मंडळ कृषी अधिकारी, उपकृषी अधिकारी, सहायक कृषी अधिकारी, खत व औषध विक्रेते तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत शेतकरी हा केंद्रबिंदू मानून सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करत खरीप हंगाम यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. शेतकऱ्यांच्या अडचणी तत्काळ सोडवून त्यांना सक्षम करण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## मंदिर जतन व संवर्धन आराखड्यातील सुरु असलेली कामे 17 मे पर्यंत पूर्ण करावीत - जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी अधिक मासात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत बाजीराव पडसाळी येथील सुरू असलेली कामे दि.17 मे पर्यंत गुणवत्तापूर्ण व गतीने पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकीयेन एस यांनी दिल्या.

श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा बाबत भक्तनिवास येथे बैठक घेण्यात आली या बैठकीस मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, नगराध्यक्षा तथा पदसिद्ध सदस्या प्रणिता भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ॲड. माधवी निगडे, प्रकाश महाराज जवंजाळ, शिवाजीराव मोरे, जिल्हा



नियोजन अधिकारी दिलीप पवार, उपकार्यकारी अभियंता भीमाशंकर मिटकरी, मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच ऑनलाइनद्वारे पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहणे व वास्तु विशारद तेजस्विनी आफळे उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकीयेन एस. म्हणाले, मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत बाजीराव पडसाळी येथील व्यंकटेश्वर मंदिर, महालक्ष्मी मंदिर, कव्हर शेड आदी कामे तात्काळ पूर्ण करावीत. यासाठी संबंधित कंत्राटदाराने कामाची गती वाढविण्यासाठी अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करावे. पुरातत्त्व विभाग व संबंधित कंत्राटदार यांनी मंदिर समितीचे सदस्य यांच्या समवेत सुरू असलेल्या कामांची पाहणी करून अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करावीत. मंदिरात कोठेही पाण्याची गळती होणार नाही याची दक्षता घ्यावी. दगडी कोटिंग कामे पुर्ण करावीत तसेच प्रांताधिकारी व मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी यांनी सुरु असलेल्या कामांचा दररोज आढावा घ्यावा. महालक्ष्मी मंदिर येथे भिंतींना ओलावा धरत असल्याने त्याची पाहणी करून तात्काळ उपाययोजना कराव्यात त्याचबरोबर पश्चिमद्वारचे काम तात्काळ सुरू करावे अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणाले, बाजीराव पडसाळी येथील कव्हर शेडचे काम सुरू असल्याने श्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन येणाऱ्या वयोवृद्ध भाविकांना रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी जाताना अडचणी येतात. अधिक मासात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता कव्हर शेडचे काम तात्काळ पूर्ण करावे. तसेच महालक्ष्मी व बालाजी मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यासाठी व्यंकटेश्वर मंदिर व महालक्ष्मी मंदिराचे काम तात्काळ पूर्ण करावे अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांना गती देण्यासाठी मंदिर समितीकडून आवश्यक ते सहकार्य मिळेल. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची होणारी गैरसोय लक्षात घेता संबंधित कंत्राटदाराने तात्काळ कामे पूर्ण करावीत असे सांगितले.

बैठकीनंतर जिल्हाधिकारी कार्तिकीयेन एस यांनी श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करुन संबधीतांना आवश्यक सुचना दिल्या.

## टंचाई कृती आराखड्यामध्ये २४६ गावे व ५९९ वाडया-वस्त्यांचा समावेश- सिईओ कुशल जैन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हयात सन २०२५-२६ या वषार्तील टंचाई कृती आराखड्यामध्ये २४६ गावे व ५९९ वाडया- वस्त्यांचा समावेश करण्यात आलेला असून त्याचा अंदाजित खर्च रक्कम रु.१२०४.१. लक्ष इतका असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.

सन २०२३ -२४ टंचाई कालावधी अंतर्गत २१४ टँकरद्वारे १८० गावांत १२७३ वाडया-वस्त्यांवर पाणीपुरवठा करण्यात आला होता.

सन २०२४-२५ टंचाई कालावधी अंतर्गत ६९ टँकरद्वारे ५९ गावांत ५८७ वाडया-वस्त्यांवर पाणीपुरवठा करण्यात आला होता.

सन २०२५-२६ या वषार्तील टंचाई कृती आराखड्यामध्ये १७८ टँकरद्वारे १४७ गावांत ५८९ वाडया/वस्त्यांवर पाणीपुरवठा करणे प्रस्तावित असून मार्च अखेर ४८ टँकर प्रस्तावित असताना एकही टँकरची मागणी आली नाही. तथापि सदयस्थितीत दि. ११.०४.२६ पासून उत्तर सोलापूर तालुक्यात रानमसले गावामध्ये एक टँकर चालु आहे.

सोलापूर जिल्ह्यात अक्कलकोट तालुक्यातील वसंतराव नाईकनगर, बार्शी तालुक्यातील भोयरे, पिंपरी आणि माळशिरस तालुक्यातील पळसमंडळ येथे असे एकूण ०४ टँकर प्रस्तावित आहेत.



सन २०२५ -२६ टंचाई कालावधी अंतर्गत एकूण टँकर फीडिंग ठिकाण संख्या ५१ असून सार्वजनिक ११ तर खाजगी ४० पाण्याच्या उद्भवचा समावेश आहे.

सन २०२४ -२५ टंचाई कालावधी अंतर्गत एकूण ८.१७ कोटींची मागणी करण्यात आसी असून अद्यापपर्यंत निधी अप्राप्त आहे.

सन २०२५ -२६ टंचाई कालावधी अंतर्गत नळ पाणी पुरवठा विशेष दुरुस्तीचे मौजे भोसे व ३९ गावे प्रादेशिक योजना (स्थ्यापत्य व यांत्रिकी दोन्ही) ता.मंगळवेढा, मौजे कासेगाव व ११ गावे प्रादेशिक योजना ता. पंढरपूर या योजनांना जिल्हाधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता मिळाली असून सदरचे काम निविदा प्रक्रियेच्या स्तरावर असल्याचे सिईओ कुशल जैन यांनी सांगितले.

### रविवारी सुट्टीचे दिवशीही पाणी टंचाई पाहणी साठी सिईओ गावात..!

**बार्शी तालुक्यातील पानगाव येथे कामांची पाहणी..!**

रविवारी सुट्टीचे दिवशी ही सोलापूर जिल्हा परिषदेचे सिईओ कुशल जैन यांनी बार्शी तालुक्यातील पानगाव येथे पाण्याचे स्त्रोत, पाण्याचे टाकीची कामे तसेच कडक उन्हामुळे ग्रामस्थांना काळजी घेणे बाबत आरोग्य केंद्रांना भेटी देऊन सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सुचना दिले आहेत. उप अभियंता वाघमारे या प्रसंगी यांनी सर्व पाणी पुरवठा विषयत कामांची माहिती सिईओ जैन यांना दिली.

## देशाच्या विकासासाठी जनगणनेत नागरिकांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा - मुख्याधिकारी सुरेश भदर

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** देशाच्या विकासासाठी व भविष्यातील नियोजना साठी जनगणनेतील माहिती अत्यंत महत्त्वाची ठरते. पायाभूत सुविधा, विविध योजना व विकास कामांसाठी ही माहिती आधारभूत असल्याने नागरिकांनी जबाबदारीने सहभाग नोंदवावा असे अवाहन सुरेश भदर, मुख्याधिकारी, अनगर नगरपंचायत यांनी केले आहे.

आगामी जनगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर प्रशासकीय तयारीला वेग आला असून, सुरेश भदर, मुख्याधिकारी, अनगर नगरपंचायत यांच्या उपस्थितीत अनगर येथील बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर येथे दि. २७, २८ व २९ एप्रिल दरम्यान प्रशिक्षणाच्या पहिल्या टप्प्याला प्रारंभ झाला आहे. या अंतर्गत प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. या प्रसंगी मुख्याधिकारी सुरेश भदर माध्यमांशी बोलत होते. त्यांनी पुढे सांगितले की, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार जनगणनेची प्राथमिक प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अनगर शहरातील जनगणना कामी एकूण २६ प्रगणक, ०४ पर्यवेक्षक व ४ राखीव कर्मचारी अशा एकूण ३४ जणांची टीम तयार करण्यात आली आहे.



**'जनगणना कामी प्रशासनाला सहकार्य करावे '**

प्रशिक्षण २७ ते २९ एप्रिल दरम्यान पार पडणार आहे. या माध्यमातून सर्व ३४ कर्मचाऱ्यांना जनगणनेचे सविस्तर प्रशिक्षण दिले जाईल. तर नागरिकांनी १ मे ते १५ मे या कालावधीत नागरिकां मार्फत स्वगणनेचा टप्पा पार पडेल. त्यानंतर १६ मे ते १४ जून दरम्यान प्रगणक घरोघरी भेट देऊन घरांची व इमारतींची नोंदणी करतील. या काळात नागरिकांनी अचूक व संपूर्ण माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करावे.

**- सुरेश भदर,** चार्ज अधिकारी तथा मुख्याधिकारी, अनगर नगरपंचायत

या प्रशिक्षण शिबिरास राजेंद्र गुंड, अतिरिक्त चार्ज अधिकारी तसेच प्रशिक्षण अधिकारी महेश गोडगे, महादेव माने, पंडीत भोरे, अंजली भूरूक, रोहित कानोडे, संयोगिता गौंडरे, मोहसीन मुलाणी, पांडुरंग नामदास आदींसह कर्मचारी उपस्थित होते.


सुवर्णसंधी! सुवर्णसंधी!
श्री रामेश्वर नगर, मौजे वैराग येथे
वैराग-माढा रोड, शिवाजी नगर, शेजारी. मध्यवर्ती ठिकाणी सर्वोत्कृष्ट लोकेशनला कलेक्टर N.A. खुले प्लॉट विक्रीसाठी उपलब्ध.
1299/- प्रति स्क्वे. फूट
मौजे मार्डी, ता. उत्तर सोलापूर मार्डी-नात्रज डांबरी रोडटच तलावालगतची 11 एकर शेतजमीन विकणे आहे.
9763764949



आरोग्यविषयक
मुळव्याध आहे ?
ऑपरेशन चा विचार करत असाल तर थांबा ऑपरेशन करून देखील कित्येक जणांचा त्रास पुर्वी पेक्षा भयंकर व उग्र रूप धारण करून पुन्हा उद्भवू शकतो म्हणून प्राचिन भारतीय आयुर्वेदिक अतिशय दुर्मिळ औषधींचा वापर करून बनवलेल्या मुळव्याध मुक्ती औषधांचा वापर करून रक्त पडणे, जखम होणे, कोंब (मोड) यांच्या वेदना, भयंकर आग (जळजळ), असह्य खाज, पचन क्रिया बिघडणे, बद्धकोष्ठता (शौचत्रास, मलावरोध, मलाचे खडे होणे) गॅसेस चा त्रास इ. सर्व समस्यांवर सुरक्षित, दुष्परिणाम रहीत, कायमस्वरूपी इलाजासाठी निः संकोच संपर्क साधावा.
संपर्क :
कुदरत हर्बल्स किल्लारी ता: औसा जि. लातुर
मो.नंबर 9970115450



शिनगारे सिटी वासुद रोड
अल्टिमेट जिमच्या समोर
सांगोला
प्लॉट देणे आहे
N.A.
3100 sft- 3200 sft
- : संपर्क : -
शिनगारे.जे.एम
8275274353
डी.बी.शिंदे
9579421465



VNP MOTORS
Multi Brand Car Sales & Services
सोलापूर मध्ये पहिले मल्टिब्रँड कार चे सुसज्ज शोरूम व वर्कशॉप
OFFER
पेट्रोल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹2949/-
डिजेल कार: SYNTHETIC OIL सर्व्हिस करा फक्त ₹3649/-
AC OVERHAUL: HATCHBACK RS. 2500/- SEDAN - 3000/- SUV - 3500/-
FREE PICK-UP & DROP
CNG RTO मान्यता प्राप्त CNG Retro Fitment Center
8000-92-8007
VNP MOTORS Pvt. Ltd.
Exclusive showroom of Second Hand Car Sales & Service
GAT No. 17/2, Hyderabad Road, Next to Ford Showroom, Solapur - 9591958007
GOVT. APPROVED CNG RETROFITTMENT CENTER & WORKSHOP


### वात्रटिका

**पहावेना डोळा**

डोळेझाक केली तरी रोज
नवेच काही घडत आहे...
गढूळता आणि गोंधळाने
वातावरण बिघडत आहे...
इथे कोंबडी पुढे दाणे आणि
गाढवापुढे फुटाणे आहेत...
कोणी सांगावे कोणाला.. तसे
इथे एकाहून एक शहाणे आहेत...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

## संपादकीय

# विकासदराला इंधनधक्का

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध आणखी लांबले, तर विकासदरावर विपरीत परिणाम होण्याचा संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक आयोगाने (एस्कॅप) दिलेली इशारा ही साऱ्या जगासाठी धोक्याची घंटा आहे. विकसनशील देशांना युद्धाची धग अधिक तीव्रपणे जाणवेल, अशी भीती हा अहवाल व्यक्त करतो. गेल्या काही काळातील भारताच्या विकासगतीलासुद्धा युद्धाने खीळ बसण्याची शक्यता असून, सन २०२६ मध्ये विकासदर ६.४ टक्के, तर पुढील वर्षी तो ६.६ टक्के राहील, असा 'एस्कॅप'चा अंदाज आहे.

जगातील इतर देशांच्या तुलनेत भारताचा विकासदर चांगला राहील, असा अंदाज असला, तरी इराण युद्धातून लवकर तोडगा न निघाल्यास विकासदराच्या घसरणीसह महागाईचाही सामना करावा लागू शकतो. त्यामुळेच अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धसमाप्तीबाबतच्या चर्चेकडे साऱ्या जगाचे डोळे लागून राहणे साहजिक आहे. गेल्या काही वर्षांत भारताच्या विकासाची गाडी वेगाने धावू लागली होती. करोनासाथीनंतर अर्थव्यवस्थेने उभारी घेतल्याने सन २०२३-२४ मध्ये ८.२ टक्के विकासदर नोंदवला गेला; त्यानंतरही २४-२५ मध्ये ७.२ टक्क्यांची सातत्यपूर्ण वाढ झाली. गेल्या वर्षी तर वस्तू व सेवा करात (जीएसटी) देण्यात आलेली सवलत, सेवाक्षेत्राने घेतलेली भरारी, परदेशस्थ नागरिकांना देशात पाठवलेला पैसा (रेमिटन्स) आणि अमेरिकी आयातशुल्कातील वाढीपूर्वी झालेली भरभक्कम निर्यात यांमुळे हा दर ७.४ राहिला.


केवळ भारतच नव्हे, तर साऱ्या आशियातील विकासदरामध्येही त्याचे प्रतिबिंब उमटले. मात्र, त्यानंतर विकासदराची गाडी मंदावली. व्यापारकरारामध्ये दबाव आणण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशियन तेलखरेदीचा मुद्दा पुढे करून भारतावर ५० टक्के आयातशुल्क लादल्याने आणि 'रेमिटन्स'वर एक टक्का कर लागू केल्याने त्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. एकीकडे अमेरिकी न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाला आयातशुल्क दहा टक्क्यांपर्यंत आणण्याचा आदेश दिल्याने भारताला दिलासा मिळाला होता; मात्र युद्धस्थितीने त्याचा आनंद साजरा करू दिला नाही.

अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्या युद्धात जगाचीच कोंडी झाली आहे; त्यातही होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्याने आखाती देशांचा संपर्क खंडित होऊन भारतासह अनेक देशांची इंधनकोंडी झाली आहे. युद्धकाळात कच्च्या तेलाच्या दरांनी शंभरी ओलांडल्याने इंधनावरील आयातखर्च वाढला आहे. गेली दोन वर्षे देशाच्या बहुतांश भागांत समाधानकारक मान्सून झाला होता. यंदा मात्र, 'एल निनो'मुळे सरासरीच्या ९२ टक्के इतक्याच पावसाचा प्राथमिक अंदाज आहे. त्याबरोबरच आखाती देशांमधील उत्पादन आणि वाहतुकीचे चक्र बिघडल्याने युरिया आणि 'डीएपी'सारख्या खतांच्या टंचाईची मोठी चिंता भेडसावत आहे. त्याचा फटका शेती उत्पादनाला बसून ग्रामीण अर्थव्यवस्था विस्कळित होऊ शकते. या अस्थिरतेमुळे परदेशी गुंतवणुकीवर मोठा परिणाम झाल्याचे दिसते.

या सगळ्या पार्श्वभूमीवर युद्ध थांबले, तरी जागतिक विकासदरात ०.३ टक्के घट होऊ शकते; युद्ध लांबले तर मात्र हा फटका अडीच टक्क्यांवर जाऊ शकतो, असे अर्थतज्ज्ञांचे अंदाज आहेत. कच्च्या तेलाचे वाढलेले दर कमी झाले, तरी युद्धपूर्व स्थितीत जाणार नाहीत, यावर अभ्यासकांचे एकमत आहे. उत्पादन शुल्कात केंद्राने दहा रुपयांची सवलत दिल्याने देशात पेट्रोल-डिझेलचे दर सध्या तरी आटोक्यात आहेत; मात्र ही तूट फार काळ सोसणे सरकारला अडचणीचे ठरेल, त्यामुळे विधानसभा निवडणुका संपल्यावर यातील काही भार ग्राहकांना सोसावा लागेल; परिणामी इंधन दरवाढ आणि वाहतूक खर्चात वाढ होऊन महागाईचा दरही ४.४ टक्क्यांवर जाण्याची भीती आहे. सातत्याने होत असलेली रुपयाची घसरण ही बा' संकटे भारतासाठी अधिक तीव्र करते; नुकतेच भारतीय अर्थव्यवस्थेचे स्थान सहाव्या क्रमांकावर गेले, त्याचेही हेच मुख्य कारण आहे. त्यामुळे येत्या काळात सरकारी खर्चावर नियंत्रण आणणे, 'रेवडी' योजनांवरील खर्चात कपात हे तातडीचे उपाय सांगितले जातात. दीर्घ काळासाठी आखातावरील इंधन अवलंबित्व कमी करून अन्य स्रोतांतून पुरवठा वाढवणे आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हरित इंधनाच्या वापरास अधिकाधिक प्रोत्साहन देऊन एकूण इंधनखर्च आटोक्यात आणण्याकडे मात्र जाणीवपूर्वक लक्ष दिले पाहिजे.

# धीरेंद्र शास्त्रींची बुद्धी भ्रष्ट झाल्याने; विषेली वक्तव्ये करून करोडो लोकांच्या भावना दुखावल्या

भारत भुमि ही महाज्ञानी, साधु, संत, थोर महात्मे, तपस्वी, क्रांतिकारक, विचारवंत, जहालवादी-मवाळवादी यांच्या अथक परिश्रमाने आणि प्रयत्नांना ही भारत भुमि निर्माण झाली आहे. या भुमित देव-दानव, देवीदेवतांनी जन्म घेतला त्यामुळेच जगाच्या पाठीवर भारत असा देश आहे की या भुमित अनेक धर्म, पंथ, जाती, भाषा, वेगवेगळी संस्कृती पहायला मिळतात आणि याला आकार व दिशा देण्याचे काम हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या गनिमी काव्याच्या माध्यमातून हिंदवी स्वराज्याची स्थापना करून केले आहे. आजही शिवाजी महाराजांचा इतिहास अजरामर आहे. देशासह जगातील १११ देश शिवजयंती मोठ्या उत्साहाने साजरी करतात आणि शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याचा व त्यांच्या इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी विदेशी अभ्यासक महाराष्ट्रात दरवर्षी मोठ्या प्रमाणात येतात. कारण शिवाजी महाराजांसारखी युध्द शैली कोणीही अवगत करू शकले नाही आणि धीरेंद्र शास्त्री म्हणतात की, शिवाजी महाराज युद्ध करून थकले, अरे मुर्ख धीरेंद्र शास्त्री बाबा शिवाजी महाराज कधीच थकले नाहीत त्यामुळेच हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. आज आपण जगात जे गोरीला युध्द पहातो त्याची सुरुवात याच मातीतून छत्रपती शिवाजी महाराजांनी केली आणि जगभरात पसरली. परंतु आज देशात धीरेंद्र शास्त्री सारखे जहरीले विषारी साप सुद्धा दिसून येतात. आपण काय बोलत आहोत याचेही भान स्वयंघोषित बाबा धीरेंद्र शास्त्री यांना नसल्याचे दिसून येते. नागपूरातील एका कार्यक्रमात धीरेंद्र शास्त्रीने वादग्रस्त वक्तव्य शिवाजी महाराजांबद्दल बोलतांना म्हणतात की, शिवाजी महाराज युद्ध करून थकले आणि रामदास स्वामींना म्हणाले, राजपाट सांभाळा. अरे मुर्ख धीरेंद्र बाबा रामदास स्वामी हे शिवाजी महाराजांचे गुरू होते आणि स्वामींचा आशीर्वाद व त्यांच्याशी विचार विमर्श नेहमीच छत्रपती शिवाजी महाराज करायचे आणि मोठ्यांचा आशीर्वाद घेण्याची परंपरा आमच्या महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात हजारो वर्षापासुन आहे. त्यामुळे रामदास स्वामींच्या आदेशाचे पालन शिवाजी महाराज नेहमीच करायचे. कारण रामदास स्वामी शिवाजी महाराजांचे गुरू होते. धीरेंद्र शास्त्री बाबा आज जो तुम्ही मोकळा श्वास घेत आहात ना तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुंण्यायीनेच घेत आहात ही गोष्ट आपण लक्षात ठेवली पाहिजे. या पृथ्वीतलावर जर शिवाजी महाराज जन्माला आले नसते तर तुम्हीही दिसले नसते. त्यामुळे तुम्ही ज्या ताटात खाता त्याला वारंवार छिद्र पाडणे बंद करावे व माफी मागुन पळवाटा काढणे बंद करावे. आपण स्वतःला महाग्यानी बाबा आणि हिंदू धर्माचे सर्वेसर्वा समजतात मग आपल्या तोंडून चुकीचे आणि लोकांच्या भावना दुखावणारे वक्तव्य कशी काय निघतात! याचेही आम्हाला आश्चर्य वाटते. परंतु आपणाला प्रसिद्धी



पाहिजे असते म्हणून आपण असे वादग्रस्त वक्तव्ये करतात ही बाब आता सर्वांच्या लक्षात आली आहे. मिडियामध्ये आपल्याला प्रसिद्धीसाठी आपल्याला स्थान मिळावे यासाठी आपण वारंवार वादग्रस्त वक्तव्ये करून प्रसिद्धी मिळवीत असतात ही बाब जगजाहीर आहे आणि नंतर माफी मागुन पळ काढतात हेही सर्वांना लक्षात आले आहे. या अगोदरही धीरेंद्र शास्त्री यांनी अशीच वादग्रस्त वक्तव्ये करून देशाच्या भोळ्याभाबड्या जनतेची दिशाभूल करून भावना दुखावल्या होत्या. एका प्रवचन दरम्यान धीरेद्र शास्त्रींनी सलग दोन दिवस मानवधर्माचे संस्थापक बाबा जुमदेवजी आणि परमात्मा एक सेवक धर्माबाबत आक्षेपार्ह विधान केल्याने हजारो सेवक संतप्त झाले होते. धीरेंद्र शास्त्रीने या आधी संत साईबाबा, संत तुकाराम महाराज व भगवान सहस्त्रार्जुन महाराज अशा अनेक संतांबद्दल व देवतांबद्दल आक्षेपार्ह विधान केलेले आहे. ही अत्यंत घृणास्पद आणि निंदनीय बाब आहे याचा सर्वच स्तरातून निषेध सुद्धा करण्यात आला होता. तरीही त्यांचा वादग्रस्त वक्तव्ये करण्याचा गोरख धंदा बंद झालेला नाही. धीरेंद्र शास्त्री स्वतःला महाराज (बाबा) समजतात; परंतु त्यांच्यात तसा कोणताही गुण दिसत नाही. फक्त समाजात फूट पाडून कटुता निर्माण करून जहर पसरविण्याचे काम करतात व स्वतःला प्रसिद्धी मिळावी या उद्देशाने त्यांचे प्रवचन असते हे त्यांच्या आक्षेपार्ह वक्तव्यावरून स्पष्ट दिसून येते. देशातील कोणताही व्यक्ती असो प्रत्येक व्यक्ती आपापल्या पद्धतीने देवीदेवतांची व साधुसंतांची पुजा अर्चना करीत असतो आणि मानतो व हा त्यांचा अधिकार आहे. त्यात बागेश्वर बाबा सारखे महाराज जहर घोळण्याचे कार्य करीत असेल तर हिंदू धर्म कदापि सहन करणार नाही. परंतु दुःखची व चिंताजनक बाब म्हणजे धीरेंद्र शास्त्री राज्यात येवून वारंवार वादग्रस्त वक्तव्ये करून माफी मागतात आणि निघून जातात तरी सुद्धा सरकार त्यांना पाठीशी घालत असुन त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई करीत नाही ही अत्यंत गंभीर बाब म्हणावी लागेल. कोणताही गुन्हेगार असो तो गुन्हा करतो आणि नंतर माफी मागतोच म्हणून काय धीरेंद्र शास्त्री सारख्या गुन्हेगाराला मोकळे सोडायचे काय? याचाही विचार सरकारने केला पाहिजे. याचप्रकारे गुन्हेगारांनी नेहमीच माफी मागितली तर त्या सर्वांनाच मोकळे सोडणार काय! असे अनेक प्रश्न निर्माण होतात. आजपर्यंत धीरेंद्र शास्त्रीने करोडो लोकांची मने दुखावली त्याचे काय? ही गोष्ट सत्य आहे की शिवाजी महाराजांच्या पुंण्यायीनेच आज बागेश्वर बाबा आपली बाबागीरी करीत आहे अन्यथा कटोरा घेऊन दारोदारी फिरावे लागले असते. आज धीरेंद्र शास्त्री इतिहासाला मलिन करणारे विषेली बाबा झाले आहेत. त्याचप्रमाणे धर्मा-धर्मात फुट पाडण्याच्या उद्देशाने धीरेंद्र कृष्ण शास्त्री म्हणतात की, देशातील नागरिकांनी चार मुले जन्माला घालायला हवीत व त्यातील एक मुलगा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला द्यायला हवा. कारण येणाऱ्या काळात हिंदूंनी आपली लोकसंख्या वाढविली नाही तर येणाऱ्या काळात हिंदूंचे अस्तित्व धोक्यात येईल असे सांगत किमान तीन ते चार मुले जन्माला घालण्याचे आव्हान शास्त्री यांनी केले. या गोष्टीला मी मानतो. परंतु याची सुरुवात धीरेंद्र शास्त्रींनी सर्वप्रथम चार मुले जन्माला घालुन करावी नंतर लोकांना ग्यान द्यावे. धीरेंद्र शास्त्री म्हणतात की हिंदूंची संख्या कमी होत आहे याकरीता चार मुले जन्माला घालने आवश्यक आहे. ही बाब धीरेंद्र शास्त्रीची आपण मान्य केली तर त्या मुलांच्या पालनपोषणाचा खर्च कोण करणार याबद्दल बागेश्वर बाबाचे मौन का? आम्ही चार मुले जन्माला घालायला तयार आहोत. त्यातील एक मुलगा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला सुध्दा देण्यास तयार आहोत. परंतु मुलांच्या पालनपोषणाचा खर्च, शिक्षणाचा खर्च व त्यांच्या पुढील आयुष्याचा खर्च कोण उचलणार याचाही खुलासा व्हायला पाहिजे. ह्या सर्व गोष्टी "उचल्लि जिभ लावली टाळ्याला" या पद्धतीची आहे. आजही देशात भुकमरी, अतिदुर्गम भागात कुपोषण, महागाई, बेरोजगारीची समस्या, आरोग्याची समस्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, शैक्षणिक समस्या, वृद्धांची समस्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे याकडे लक्ष न देता धीरेंद्र शास्त्री चार मुले जन्माला घालण्याचे आव्हान करतात ही तर बुद्धी भ्रष्ट झाल्याची निशानी दिसून येते. आजच्या परिस्थितीत एका मुलाचे पालनपोषण करणे कठीण आहे आणि धीरेंद्र शास्त्री म्हणतात चार मुले जन्माला घाला हे सर्व मुर्खपणाचे लक्षण आहे. धीरेंद्र शास्त्री याचे नागपूरातील अनेक वादग्रस्त वक्तव्ये लक्षात घेता नागपूरच्या प्रसिद्ध छिंदवाडा रोडवरील दवाखान्यात त्यांनी उपचार घ्यायला पाहिजे. परंतु त्यांनी आतापर्यंत केलेल्या वादग्रस्त वक्तव्ये लक्षात घेता त्यांच्यावर कठोर कारवाई होणेही गरजेचे आहे. कारण त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यामुळे करोडो लोकांची मने दुखावली आहेत. याकरीता सरकारने धीरेंद्र शास्त्री यांच्या जिभेवर आवर घालावा. जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं. ९९२१६९०७७९, नागपूर.

# पालखी मार्ग, तळांवर सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी सुचविलेल्या कामांना प्राधान्य - जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** आषाढी शुद्ध एकादशी सोहळा 25 जुलै, 2026 रोजी होणार असून या सोह्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज पालखी सोहळा तसेच अन्य संतांच्या पालखी सोबत पायी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. भाविकांना सोयी सुविधा मिळण्यासाठी पालखी मार्ग तळ तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी सुचवलेली कामे प्राधान्याने पूर्ण करणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी सांगितले.

आषाढी यात्रा 2026 च्या अनुषंगाने पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्तांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ



महाराज औसेकर, प्रांत अधिकारी सचिन इतापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम तसेच दहा मानांच्या पालख्यांचे विश्वस्त, सोहळा प्रमुख ऑनलाइन द्वारे बैठकीस हजर होते.

आषाढी यात्रा सोहळ्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून पालखी सोहळे पंढरपूरकडे प्रस्थान करत असतात. पालखी सोहळ्यासोबत दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढत आहे. पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी मार्ग व तळांवर कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेऊन अधिकच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील. तसेच पालखी मार्गावर सोहळ्यांसाठी वाहतुकीची समस्या निर्माण होऊ नये यासाठी स्वतंत्र वाहतूक अधिकारी यांची नेमणूक करण्यात येईल. पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या बैलजोडी यांना चारा पाणी वॉटरप्रूफ तंबू याची देखील सोय करण्यात येईल.

आषाढी यात्रा सोहळा पावसाळ्यात येत असल्याने भाविकांच्या सुविधेसाठी वाटरप्रूफ मंडपची संख्या वाढविण्यात येईल राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात पालखी सोहळ्यांना काही अडचणी निर्माण झाल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्या अडचणी सोडवल्या जातील. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाच्या विस्तारीकरण करण्यासाठी भूसंपादनाचे काम सुरू करण्यात आले आहे. तसेच यंदाचा आषाढी यात्रा सोहळा सर्वांच्या सहकायार्ने अधिक चांगला कसा होईल या दृष्टीने नियोजन करण्यात येईल असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी यावेळेस सांगितले.

यावेळी दहा मानाच्या पालख्यांचे विश्वस्त व सोहळा प्रमुखांनी पालखी मार्ग तसेच पालखीतळाच्या ठिकाणी विविध सुविधा बाबतची मागणी केली. यामध्ये मोबाईल टॉयलेट ची संख्या वाढवावी, पालखी सोहळ्याच्या ठिकाणापासून रुग्णवाहिका सोबत असावी. पालखी मार्गावर वॉटरप्रूफ मंडप ची संख्या वाढवावी. पालखी मुक्कामाच्या शाळा, कॉलेज, समाज मंदिर या ठिकाणी व्यवस्था व्हावी मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छता व अखंडित वीजपुरवठा व पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा करावा. पालखीतळांसाठी वाढीव जागा मिळावी. मुख्य रस्त्यापासून पालखी सोहळे मुक्कामाच्या ठिकाणी जाताना रस्ते अरुंद असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी होते ते रस्ते रुंद करून मिळावेत. पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांचा इन्शुरन्स करावा अशा विविध मागण्या सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी केल्या.

## भगवंत

होय अंबरीश वरद तू श्री विष्णू भगवंत
आहे श्रद्धा माझी देवा तू पालक अनंत।
रूप तुझे साठवती नित्य डोळ्यात सारे
दुःख सहज विसरूनी जाती भजनात सारे॥

बार्शी निवासी तू तुझा भव्य हा दरबार
महिमा पंढरीच्या विठूसंगे तुझी अपरंपार।
युगे युगे आहेस तू भक्तांचा आधार,
तुझ्या नामाने होतो रे आमुचा उद्धार॥

तल्लीन होऊनी देवा रोज तुझ्या चरणी
भरते येई आनंदाचे होते सुखाची भरणी।
राहू दे अखंड कृपा अशी मजवर तू ईश्वरी
जीवन सफल होऊ दे रे तुझ्या या भूवरी॥

**रचना: मोहम्मद शेख, बार्शी**
(9960310015)

# लोकमंगल महाविद्यालयात शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा (ए. आय) वापर याविषयी व्याख्यान संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीसंलग्नित महाविद्यालयात " शेती व कृत्रिम बुद्धिमत्ता वापर" याविषयी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानासाठी मार्गदर्शक म्हणून नेहा राचल ह्या लाभल्या होत्या. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना शाश्वत शेती म्हणजे काय व त्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर कसा फायदेशीर आहे याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) वापर केल्याने संसाधनांची बचत, पर्यावरणाचे रक्षण आणि उत्पादनात वाढ होते. याद्वारे अचूक शेतीमध्ये सॅटेलाईट इमेज आणि ड्रोनच्या मदतीने शेतातील मातीचा दर्जा, ओलावा आणि पिकांची वाढ तपासली जाते. यामुळे संपूर्ण शेतात खते किंवा पाणी न वापरता जिथे गरज आहे तिथेच वापर करणे शक्य होते. एआय सेन्सर्स जमिनीतील ओलावा आणि हवामानाचा



अंदाज घेऊन पिकांना नक्की कधी आणि किती पाण्याची गरज आहे हे ठरवतात. यामुळे २५% पर्यंत पाण्याची बचत होऊ शकते. पिकांवरील रोगांची सुरुवातीच्या काळातच ओळख पटवण्यासाठी एआय आधारित इमेज प्रोसेसिंगचा वापर महत्वपूर्ण ठरतोय. यामुळे कीटकनाशकांचा अनावश्यक वापर कमी करण्यासाठी मदत होऊ शकते. जमिनीतील पोषक तत्वांच्या कमतरतेचे विश्लेषण करून नेमकी कोणती खते किती प्रमाणात वापरावीत, याचे अचूक मार्गदर्शन शेतकऱ्यांना एआय तंत्रज्ञानामुळे मिळणे शक्य झाले आहे. विद्यार्थ्यांनी शेती व ए आय संबंधित विविध विषयांवर त्यांच्याशी चर्चा करून आपल्या शंकाचे निरसन करून घेतले. या कार्यक्रमाचे समन्वयन प्रा वर्षा मानेदेशमुख यांनी केले. या कार्यक्रमास लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अमोल शिंदे, लोकमंगल कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सचिन फुगे, लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सागर महाजन , महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बचेरी ग्रामस्थांनी विविध विकासकामांसाठी राम सातपुते यांची भेट

**माळशिरस (कटूसत्य वृत्त):-** बचेरी गावातील प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने आमदार यांची भेट घेत विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. यावेळी अनेक महत्त्वाच्या विकासकामांबाबत सकारात्मक चर्चा होत संबंधित प्रशासनाला तातडीने सूचना देण्यात आल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

प्रा. सदाशिव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली बचेरी भाजप अध्यक्ष पै. रामभाऊ गोरड यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आमदार सातपुते यांची भेट घेतली. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी शिंदे, बालाजी गोरड, संतोष खेडेकर, लहू माने तसेच



मधुकर दडस उपस्थित होते.

बैठकीत शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी शिंदे यांनी गावातील शाळेसाठी नवीन 12 वर्गखोल्यांची मागणी केली. या मागणीची दखल घेत आमदार सातपुते यांनी त्यापैकी 6 वर्गखोल्यांना तातडीने मंजुरी मिळण्यासाठी संबंधित प्रशासनाला सूचना दिल्याचे सांगण्यात आले.

तसेच, भोजलिंग गोरड वस्ती परिसरात अतिरिक्त विद्युत पंप डीपीची आवश्यकता असल्याचे बालाजी गोरड यांनी निदर्शनास आणून दिले. या मागणीवरही सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित ठिकाणी डीपी उभारणीसाठी शिफारस करण्याबाबत स्वीय सहाय्यकांना निर्देश देण्यात आले.

दरम्यान, गावठाणातील घराकडे जाणाऱ्या रस्त्याच्या प्रश्नावर मधुकर दडस यांनी निवेदन सादर केले. ग्रामपंचायत व संबंधितांकडून या प्रकरणात टाळाटाळ होत असल्याची तक्रार करण्यात आली. याची गंभीर दखल घेत आमदार सातपुते यांनी गटविकास अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधत तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

याशिवाय ग्रामपंचायत हद्दीतील अंतर्गत रस्ते, मुरमीकरण, बौद्ध वस्ती सुधार निधी, सभामंडप उभारणी आदी विविध विकासकामांसंदभार्तील मागण्यांचे निवेदनही रामभाऊ गोरड यांनी सादर केले. सर्व मागण्या मार्गी लावण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन आमदार सातपुते यांनी यावेळी दिले.

ग्रामस्थांच्या प्रश्नांवर तत्काळ प्रतिसाद देत जागेवरूनच प्रशासनाशी संपर्क साधून कामांना गती देण्याची भूमिका घेतल्याने आमदार राम सातपुते यांच्याबद्दल ग्रामस्थांमध्ये आपुलकीची भावना अधिक दृढ होत असल्याची प्रतिक्रिया यावेळी व्यक्त करण्यात आली.

# आर्द्रा मॉल च्या दहा ग्राहकांना दुबईची ट्रिप- शुभम भुतडा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर फॅशनचे नवे डेस्टिनेशन असलेल्या आर्द्रा मॉलने आपल्या आदरणीय ग्राहका करिता 4000 च्या खरेदी वर कुपन ची भेट दिली होती त्यात एकूण कुपन मधून दहा कपल्स ना दुबईची ड्रीप भेट देण्यात आली असल्याचे मॅनेजिंग डायरेक्टर शुभम भुतडा यांनी सांगितले.

सम्राट चौक डी मार्ट समोर असलेल्या महेश नगर येथे असलेल्या आर्द्रा मॉल द फॅमिली फॅशन मध्ये नुकतेच संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक व मार्गदर्शक बाबा मिस्त्री आणि चौडेश्वरी तोगटवीर क्षत्रिय पतपेढी चे चेअरमन लक्ष्मीकांत रामचंद्र उदगिरी हे होते.

लकी ड्रॉ कुपनचे योजना पार पडली यामध्ये जवळजवळ 400 नंबर आणि बक्षिसे असून यात मेगा बक्षीस म्हणून 10 कपल्स ना दुबईला पाठवण्यात येणार आहे. दुबईचे मानकरी यांची नावे

1. सुनिता रवींद्र साळुंखे
2. श्रुती अंकलगी
3. प्राजक्ता बनकर
4. जोसेफिया जब्बार
5. संस्कार बिराजदार
6. नम्रता विश्वनाथ ढवणे
7. विजय अवस्कर
8. कल्लप्पा हिरोबा
9. दुर्गेश बापूराव मगर
10. श्वेता पवार

फॅशनचे नवीन डेस्टिनेशन म्हणून सोलापूर शहर व परिसरातील ग्राहक आर्द्रा मॉल कडे पाहतात तसेच आज लातूर, धाराशिव, बीड पर्यंतचे ग्राहक देखील लग्नबस्ता बांधण्यासाठी मोठ्या हौसेने आद्रा मॉलला व्हिजिट करतात. त्यामुळे त्यांना काहीतरी आपण देणे लागतो या उद्देशानेच ही योजना राबविण्यात आली असल्याचे शुभम भुतडा यांनी सांगितले.

सदर या लकी ड्रॉ कार्यक्रमास आदरणीय ग्राहक मित्रपरिवार पाहुणे तसेच व्यापारी मंडळ खूप मोठ्या प्रमाणात उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्तावना मॅनेजर विजय अय्यर यांनी केले तर आभार अभिषेक सोनी यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व स्टाफ नी यथोचित प्रयत्न केले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# ग्रामीण भागातील भारनियमन थांबवून पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा करा - खा. प्रणिती शिंदे आक्रमक



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-**महावितरणकडून ग्रामीण भागात सुरू असलेल्या वीज भारनियमनामुळे शेतकरी व पशुपालक मोठ्या अडचणीत सापडले असून, त्यांना शेती व दैनंदिन गरजांसाठी आवश्यक वीजपुरवठा मिळत नाही. त्यामुळे महावितरणने तातडीने ग्रामीण भागातील भारनियमन थांबवून पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा करावा, अशी मागणी खासदार प्रणिती शिंदे यांनी केली आहे.

जिल्ह्यातील मंगळवेढा, पंढरपूर, मोहोळ, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर आणि अक्कलकोट या तालुक्यांमध्ये अपुरा व अनियमित वीजपुरवठा होत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात येत आहेत. वारंवार होणाऱ्या भारनियमनामुळे शेतकऱ्यांना पाणी उचलण्यात अडचणी येत असून शेती उत्पादनावर परिणाम होत आहे. तसेच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

या पार्श्वभूमीवर खासदार शिंदे यांनी महावितरण प्रशासनाचे निवेदनाद्वारे लक्ष वेधत ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होत असलेल्या परिणामांची गंभीर दखल घेतली आहे. ग्रामीण भागात वारंवार बंद पडणाऱ्या वितरण ट्रान्सफॉर्मर (डीपी) ची तत्काळ दुरुस्ती करावी, अशीही त्यांनी मागणी केली आहे.

शेतकरी व नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन सध्याच्या भारनियमनात तातडीने कपात करून नियमित व अखंड वीजपुरवठा सुरू करावा, असे स्पष्ट निर्देशही त्यांनी महावितरण अधिकाऱ्यांना दिले आहेत.

मोहोळ तालुक्यातील विविध गावांना भेट देऊन खासदार प्रणिती शिंदे यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रत्येक ठिकाणी वीज भारनियमनाबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. यानंतर त्यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता सुनील माने यांना निवेदन दिले. भारनियमन तातडीने बंद न केल्यास काँग्रेस पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मोहोळ तालुकाध्यक्ष सुलेमान तांबोळी यांनी दिला.

# अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण करू नका; अन्यथा महाराष्ट्रात तीव्र आंदोलन - नंदकुमार केंगार

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय होलार समाज संघटनेच्या वतीने पंढरपूर येथे आयोजित भव्य ऐतिहासिक परिषदेत अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर तीव्र भूमिका मांडण्यात आली. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार केंगार यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, ह्लअनुसूचित जातींमध्ये ह्यअबकडह्न उपवर्गीकरण करू नये. अन्यथा महाराष्ट्रात व्यापक व तीव्र आंदोलन छेडले जाईल.या परिषदेत बदर समितीने सादर केलेल्या अहवालाचा निषेध करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या घटनात्मक अधिकारांचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत, अनुसूचित जातींचे विद्यमान १३ टक्के आरक्षण तसेच ठेवण्याची मागणी करण्यात आली.



नंदकुमार केंगार यांनी पुढे सांगितले की, 'जर सरकारने उपवर्गीकरणाचा निर्णय घेतला, तर होलार समाज रस्त्यावर उतरेल. येणाऱ्या आषाढी वारीदरम्यान मुख्यमंत्री यांना अडवण्याचा इशाराही त्यांनी दिला.' तसेच, या विषयावर ऑनलाइन निवेदन सरकारला सादर करण्यात आले असून, परिषदेत मंजूर ठराव लवकरच मुख्यमंत्री यांना देण्यात येणार असुन पुणे येथे बार्टीच्या कार्यालयावर मोर्चा काढून 'ताळे ठोका' आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला. 'जर सरकारने आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले, तर महाराष्ट्रातील एकाही मंत्र्यांना रस्त्यावर फिरू देणार नाही. असा इशाराही नंदकुमार केंगार यांनी दिला.

या परिषदेत अखिल भारतीय होलार समाज संघटनेचे राष्ट्रीय नेते ॲड. किरण जावीर पुणे यांनी ठरावाचे समर्थन करत मनोगत व्यक्त केले. परिषदेला संघटनेचे राष्ट्रीय मार्गदर्शक माजी शिक्षण अधिकारी ज्ञानदेव जावीर राष्ट्रीय महासचिव हैदर केंगार, राष्ट्रीय संपर्कप्रमुख दिपक ऐवळे, महाराष्ट्र राज्याअध्यक्ष रणजीत ऐवळे, राज्य सरचिटणीस मधुकर राष्ट्रीय प्रवक्ते संदीप गुळवे भंडगे राज्य उपाध्यक्ष सुनील ढोबळे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन सोलापूर जिल्हाध्यक्ष सतीश उर्फ मुन्ना केंगार, ॲड.चारूशीला गेजगे आणि सिद्धार्थ हेगडे यांनी केले होते. या परिषदेला पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, मुंबई आणि कोकण भागातील मोठ्या संख्येने समाजबांधव व पदाधिकारी उपस्थित होते.

# पाण्याची उपलब्धता असूनही विजेअभावी पिके करपू लागली

**माढा (कटूसत्य वृत्त):-** वाढते उष्णतामान, पिकांना वाढती पाण्याची गरज आणि त्यातच वीजपुरवठ्यातील अनियमितता यामुळे तालुक्यातील शेतकरी अक्षरशः हैराण झाले आहेत. नियमानुसार आठ तास मिळणारा वीजपुरवठा सध्या जेमतेम तीन तासांवर आला असून, दिवसेंदिवस परिस्थिती अधिकच गंभीर होत असल्याचे चित्र ग्रामीण भागात दिसून येत आहे.

जिल्ह्यात सर्वत्र हीच स्थिती असून पाण्याची उपलब्धता असतानाही विजेअभावी शेतकऱ्यांना पिकांना पाणी देता येत नाही. परिणामी पिके करपू लागली असून मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. जिल्ह्यातील सुमारे १५०२ फीडरद्वारे ११ लाख ३९ हजार ग्राहकांना वीजपुरवठा केला जातो. यापैकी ४७४ फीडरवरील (२५ एमपीआरपेक्षा जास्त लोड) वीजपुरवठा सायंकाळी सहा ते रात्री दहापर्यंत बंद ठेवावा लागत असल्याची माहिती मिळत आहे.

कृषिपंपासाठीच्या वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे शेतकऱ्यांना मानसिक आणि आर्थिक तणावाचा सामना करावा लागत आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठ्याची वेळ कमी करण्यात येत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. उन्हाची तीव्रता वाढत असताना पिकांची पाण्याची गरज वाढली आहे, मात्र अघोषित भारनियमनामुळे शेतीपिके धोक्यात आली आहेत.

दरम्यान, राज्य सरकारने एप्रिल २०२४ मध्ये 'मुख्यमंत्री बळीराजा मोफत वीज योजना' जाहीर करून साडेसात अश्वशक्तीपर्यंत मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहे. ही योजना मार्च २०२९ पर्यंत लागू आहे. तसेच 'मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी' योजनेअंतर्गत सौरपंपासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. तरीही काही शेतकरी सिंगल फेजवरून अनधिकृतरीत्या कृषिपंप चालवत असल्याचे आढळत आहे.

यामुळे वीज चोरीला अप्रत्यक्ष चालना मिळत असून रोहित्रांवर अतिरिक्त ताण येऊन ते जळण्याचे प्रकार वाढले आहेत. सायंकाळनंतर घरगुती वापरासाठी असलेल्या सिंगल फेज लाईनवर कृषिपंप जोडले जात असल्याने चार तासांचे भारनियमन करावे लागत असल्याचे महावितरणच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना नियमित आणि पुरेसा वीजपुरवठा देण्याची मागणी जोर धरत असून, अन्यथा आंदोलनाचा इशाराही दिला जात आहे.

## अकलूज नगरपरिषद,अकलूज

**ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)**
**फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२**
Gmail-comcakluj21@gmail.com **स्थापना दिनांक ०३-०८-२०२१**

जा.क्रं./१२११/अनप/२०२६ दिनांक :-२७/०४/२०२६

**अकलूज नगरपरिषद, , अकलूज**
**निविदा सूचना सन २०२६-२०२७**

अकलूज नगरपरिषदेमार्फत अंतर्गत खालील कामाकरिता तरी योग्य त्या कंत्राटदाराने आपले मोहर बंद निविदा दि. २८/०४/२०२६ ते ०५/०५/२०२६ दु.५:०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी, अकलूज नगरपरिषद यांचे कार्यालयाकडे सादर करावे. सदर कामाची कोरी निविदा दि. २८/०४/२०२६ ते ०५/०५/२०२६ पर्यंत अकलूज नगरपरिषद कार्यालयात निविदा फॉर्म मिळेल.

| अ.क्र. | तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | कामाचे वर्णन | निविदा फॉर्म किमंत | कामाचा कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अकलूज नगरपरिषद सन २०२६-२०२७ करिता मंडप व साहित्य पुरवठा करणे. | १०,००,०००/- | १००००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | ३६५ दिवस |
| ०२ | अकलूज नगरपरिषद सन २०२६-२०२७ कामी चहा, नाष्टा, जेवण, व इतर अनुषंगिक पुरवठा करणे. | ५,००,०००/- | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | ३६५ दिवस |
| ०३ | अकलूज नगरपरिषद सन २०२६-२०२७ कामी फोटो चित्रीकरण,व्हि.डी.ओ. शुटींग करणे व सिडी तयार करणे. | ५,००,०००/- | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | ३६५ दिवस |
| ०४ | अकलूज नगरपरिषद सन २०२६-२०२७ करिता छापील स्टेशनरी व साहित्य पुरवठा करणे. | १०,००,०००/- | १००००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | ३६५ दिवस |

वरीलप्रमाणे कामा करिता इच्छुक कंत्राटदाराने आपली सिलबंद निविदा अकलूज नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. २८/०४/२०२६ ते ०५/०५/२०२६ या कालावधी पर्यंत सादर करावी. तसेच मुदती नंतर आलेल्या व निविदा बयाना रक्कम न भरलेल्या धारकांचा विचार केला जाणार नाही. कोणतीही निविदा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषेदेने राखुन ठेवला आहे.

**सही/-**
**(सचिन पाटील)**
**मुख्याधिकारी गट अ(निवड श्रेणी)**
**अकलूज नगरपरिषद,अकलूज**

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

अभिमन्यू सदाशिव साबळे वय-७६ वर्षे.धंदा-मजुरी रा.पानमळा ३० पुणे } **अर्जदार**
**विरूध्द**
ग्रामविकास अधिकारी,ग्रामपंचायत वाळूज }**सामनेवाला**

ज्याअर्थी वर नमुद अर्जदार यांचे वडील सदाशिव निवृत्ती साबळे मृत्यू दिनांक- ६/९/२०१० रोजी मौजे वाळूज ता. मोहोळ. जि. सोलापूर येथे झाला आहे. अर्जदार याने सदर सामनेवाला यांच्याकडे अर्जदार यांचे वडील सदाशिव निवृत्ती साबळे वरील नमुद तारखेनुसार मागणी केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्यांच्याकडील माहे सप्टेबर २०१० चे आभिलेखात अर्जदार यांचे वडील यांची मृत्यूनोंद नसल्याबाबतचा दाखला दिला व त्याबदल सदर अर्जदारने या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील आभिलेखात मृत्यूचीनोंद घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप / हरकत असल्यास दि. १०/५/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे मृत्यू दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी. हे प्रसिद्धीकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता.२६/४/२०२६

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

## जाहिर प्रसिध्दीकरण अर्ज.नं. /२०२६

**मोहोळ येथील मे.तहसिलदार साहेब यांचे समोर**

सज्जन विठ्ठल सिरसट वय -५० वर्षे. धंदा- मजुरी रा. यावली ता.मोहोळ } **अर्जदार**
**विरूध्द**
ग्रापंचायत यावली, ता.मोहोळ, जि.सोलापूर }**सामनेवाला**

ज्याआर्थी वर नमुद अर्जदार यांची सज्जन विठ्ठल सिरसट जन्म दि. १/६/१९७६ रोजी मौजे यावली ता.मोहोळ.जि.सोलापूर येथे झाला आहे.

अर्जदारने त्याबदल सदर या में कोर्टात सामनेवाला यांच्याकडील सज्जन विठ्ठल सिरसट यांच्या जन्माबाबत सामनेवाला यांच्या कडे जन्म दाखल्याची मागणी वरील नमूद तारखे नुसार केली असता त्यावेळी सामनेवाला यांनी त्याच्या कडील माहे जून १९७६ च्या अभिलेखात अर्जदार यांची जन्म नोद नसल्याचा दाखला दिला व त्याबद्दल सदर अर्जदाराने या. में कोर्टात सामनेवाला यांच्यकडील आभिलेखात जन्माचीनोंद करून घेणे कामी आदेश होणेसाठी अर्ज केला आहे. याबाबत कोणाचा आक्षेप/हरकत असल्यास दि.१०/५/२०२६ रोजी किंवा हि नोटीस प्रसिद्ध केल्यापासून १५ दिवसाच्या आत स्वत अथवा वकिलामार्फत में कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची कसलीही हरकत नाही आल्यास अर्जातील मागणी प्रमाणे जन्म दाखला देणेबाबत सामनेवाला यांना आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिद्धकरण आमच्या सहीशिक्या निशी दिले असे ता. २६/४/२०२६

सही/-
शिक्का
तहसिलदार,मोहोळ.

# 'गँन्ट्री स्ट्रक्चर'वर चढून उग्र आंदोलन व सामूहिक आत्मदहनाचा इशारा- अक्षय भांड

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते परिसरातील वीज प्रश्न आता गंभीर झाला असून, प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे तरुणांमध्ये मोठा संताप आहे. जोपर्यंत दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई होत नाही आणि वीज पुरवठा सुरळीत होत नाही, तोपर्यंत हे आंदोलन थांबणार नाही," अशी माहिती राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड यांनी दिली असुन येणाऱ्या ५ मे रोजी सब-स्टेशनच्या गँन्ट्री स्ट्रक्चरवर चढून उग्र आंदोलन व सामूहिक आत्मदहनाचा इशारा महावितरणच्या उपकार्यकारी अभियंत्यांना यांना लेखी निवेदन द्वारे राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड व तरुणांने दिला आहे.



सदर देण्यात आलेल्या निवेदनामध्ये असे म्हणण्यात आले आहे की,नातेपुते शहर आणि परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून महावितरणच्या अत्यंत बेजबाबदार आणि निष्क्रिय कारभारामुळे सर्वसामान्य नागरिक, शेतकरी आणि व्यापारी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. वारंवार खंडित होणारी वीज आणि कमी दाबाने होणारा वीज पुरवठा यामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. या अन्यायाविरोधात आता नातेपुते विभागातील सर्व तरुण आणि नागरिक एकवटले असून, प्रशासनाचे डोळे उघडण्यासाठी येत्या ५ मे रोजी सब-स्टेशनच्या 'गँन्ट्री स्ट्रक्चर'वर चढून उग्र आंदोलन व सामूहिक आत्मदहन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

नातेपुते विभागातील वीज समस्या सुटण्याऐवजी दिवसेंदिवस गंभीर होत चालल्या आहेत. शेतीला वेळेवर वीज मिळत नाही, तर कमी दाबाच्या विजेमुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होत आहे. वारंवार तक्रारी करूनही संबंधित लाईनमन आणि इंजिनिअर्स याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप यावेळी तरुणांनी केला आहे. म्हणून येत्या मंगळवारी, ५ मे २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता सर्व तरुण एकत्र येऊन सब-स्टेशनवर हे टोकाचे आंदोलन करणार आहेत. या आंदोलनादरम्यान जर कोणाच्या जीवितास धोका निर्माण झाला किंवा जीवितहानी झाली, तर त्याला सर्वस्वी महावितरण प्रशासन आणि स्थानिक शासन जबाबदार राहील, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आसुन या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा (वहिनी) पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूर जिल्हाधिकारी व पोलीस प्रशासनाला माहितीसाठी पाठवण्यात आली असून राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सोलापूर जिल्हा कार्यकारी अध्यक्ष अक्षय भांड,संदिप चांगण, शेखर राऊत, सागर देवडे वृषभ वाडेकर, सनी गवळी, प्रथमेश पांढरे, बाबा काळे, सुनिल ढोबळे, जनार्दन पवार, प्रशांत ठोंबरे, धनराज डफळ, शुभम सोरटे, अर्जून पिसाळ, तुषार जठार, अजित पांढरे, सत्यजीत सावंत, संग्राम साळवे, अक्षय ठोंबरे या तरुणांनी महावितरणच्या उपकार्यकारी अभियंत्यांना देण्यात आलेल्या निवेदनावर सह्या केल्या आहेत.


## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा
२५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका- चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 223

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | | | 4 | | | 6 | |
| | | 1 | 6 | | | 8 | 9 | |
| | | 9 | 8 | 3 | 1 | 5 | | 7 |
| 4 | 9 | | 1 | 5 | 7 | | | |
| | | | | | | | | |
| | 5 | 3 | | | 4 | | | |
| 9 | 6 | | 4 | 1 | 5 | | | 8 |
| 1 | | | 7 | 6 | 3 | 2 | | |
| 3 | | | | 2 | 8 | | 5 | 1 |



|| अंबरिष वरद श्री भगवंत ||
बार्शीचे ग्रामदैवत
श्री भगवंत प्रकट दिना निमित्त महापुजेसाठी
कार्यसम्राट, विकसनशील,लाडके नेतृत्व
महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री
मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब
आपले भगवंत नगरीत हार्दिक स्वागत...!
मा.ना.श्री.जयकुमारजी गोरे साहेब
(पालकमंत्री,सोलापूर)
मा.श्री.राजाभाऊ राऊत
(मा.आमदार,बार्शी)
मा.श्रीकांत भारतीय
विधानपरिषद सदस्य
मा.अभिमन्यू पवार
आमदार,औसा विधानसभा
मा.राणाजगजितसिंह पाटील
आमदार, तुळजापूर विधानसभा
मा.सुभाष देशमुख
आमदार, सोलापूर (दक्षिण) विधानसभा
मा.रणजितसिंह निंबाळकर
मा.खासदार, माढा लोकसभा
मा.विजयकुमार देशमुख
आमदार, सोलापूर (उत्तर) विधानसभा
मा.सुजितसिंह ठाकूर
मा.विधानपरिषद सदस्य
मा.सचिन कल्याणशेट्टी
आमदार, अक्कलकोट विधानसभा
मा.समाधान आवताडे
आमदार, पंढरपूर विधानसभा
मा.देवेंद्र कोठे
आमदार, सोलापूर (शहर मध्य) विधानसभा
मा.राजन पाटील
मा.आमदार, मोहोळ विधानसभा
मा.दिलीप माने
मा.आमदार, सोलापूर(द.)
मा.प्रशांत परिचारक
मा. विधानपरिषद सदस्य
मा.जयवंतराव जगताप
मा.आमदार, करमाळा विधानसभा
मा.राम सातपुते
मा.आमदार, माळशिरस विधानसभा
मा.अर्चनाताई पाटील
अध्यक्ष, जि.प.धाराशिव
मा.दिपक वैद्य
अध्यक्ष, जि.प.सोलापूर
मा.शशिकांत चव्हाण
जिल्हाध्यक्ष, भा.ज.पा.सोलापूर
मा.शहाजीभाऊ पवार
भा.ज.पा. प्रदेश कार्य. सदस्य
मा.दत्ताभाऊ कुलकर्णी
जिल्हाध्यक्ष, भा.ज.पा.धाराशिव
मा.चेतनसिंह केदार
जिल्हाध्यक्ष, भा.ज.पा.सोलापूर
मा.रोहिणीताई तडवळकर
भा.ज.पा. शहराध्यक्ष, सोलापूर
मा.रश्मीताई बागल
गटनेत्या, जि.प.सोलापूर
मा.रणजितसिंह शिंदे
चेअरमन, जिल्हा दुधसंघ
मा.तेजस्विनीताई कथले
नगराध्यक्षा, बार्शी नगरपरिषद
मा.मिनाक्षीताई रोंगे
सभापती, पंचायत समिती,बार्शी
मा.विजय गरड (सर)
सभापती, कृ.उ.बाजार समिती,बार्शी
स्वागतोत्सुक : बार्शी नगरपरिषद,बार्शी, श्री भगवंत देवस्थान,बार्शी, कृषि उत्पन्न बाजार समिती,बार्शी, पंचायत समिती,बार्शी व श्री भगवंत बहुउद्देशीय संस्था, बार्शी, भारतीय जनता पार्टी बार्शी शहर व तालुका
Graphix Curve